**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ०७/२०१७** **दिनांक २४/०१/२०१७** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. उत्तम महाडकर,**
विभाग प्रमुख,
कृषिविद्या विभाग
९४२२७९११९८

**डॉ. ज्ञानेश्वर जगताप,**
नोडल ऑफिसर,
कृषिविद्या विभाग
९४०३९८८१४३

**प्रा. वैभव राजेमहाडिक,**
तांत्रिक अधिकारी,
कृषिविद्या विभाग
९४२०६७३२६७


| मागील हवामान सारांश दि. २०/०१/२०१७ ते २४/०१/२०१७ | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ०.० |
| पाऊस (मिमी) १/१/१७ पासून | : | ०.० |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | ४५०४.१ |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३१.४–३५.२ |
| किमान तापमान (अं.से) | : | १२.६–१४.५ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ८७–९६ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ४०–४७ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | २.४–६.९ |

| हवामान पूर्वानुमान (२५/०१/२०१७ सकाळी ८:३० पासून २९/०१/२०१७ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **हवामानांचे घटक** | : | २५/०१ | २६/०१ | २७/०१ | २८/०१ | २९/०१ |
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३७ | ३६ | ३६ | ३५ | ३५ |
| किमान तापमान (अं.से) | : | २१ | २० | १९ | १९ | १८ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | १ | ३ | ३ | ४ | १ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ६२ | ६५ | ६२ | ६० | ५८ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ४५ | ४५ | ४६ | ४३ | ४२ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ०१० | ०१० | ०१७ | ०१४ | ०११ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

**:हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:**

**दिनांक २५ ते २९ जानेवरी २०१७ पर्यंत अवकाश अंशत: मेघाच्छादित राहिल. दिनांक २५ ते २९ जानेवारी, २०१७ पर्यंत वाऱ्याचा वेग १० ते १७ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **आंबा, काजू** | फुलोरावस्था | • आंबा पिकावरील तुडतुडे या किडीपासून संरक्षण करण्याकरिता सायपरमेथ्रीन २५ टक्के प्रवाही ३ मि. ली. किंवा फेनव्हलरेट २० टक्के प्रवाही ५ मि. ली. किंवा डेकॅमेथ्रीन २.८ टक्के प्रवाही ९ मि. ली. किंवा निंबीसीडीन १,००० पी. पी. एम्. २० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून झाडाच्या खोडावर, फांद्यांवर व पानांवर बसेल अशारितीने संपूर्ण झाडावर फवारणी करावी.<br>• काजू झाडावरील रोठा या किडीच्या नियंत्रणासाठी रोठयाच्या अळया १५ मि.मी. आकाराच्या पटाशीच्या सहाय्याने काढून टाकाव्यात व क्लोरोपायरीफॉस (२० टक्के प्रवाही) १० मि.लि. प्रति लिटर या प्रमाणात द्रावण तयार करून प्रादुर्भित भाग त्या द्रावणाने चांगला भिजवावा व उरलेले द्रावण झाडाच्या बुध्यालगत मुळाशी ओतावे.<br>• काजूवरील ढेकण्या (टी मॉस्किटो) आणि फुलकिडीचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता आहे त्याचा बंदोबस्त करण्याकरिता प्रवाही प्रोफेनफॉस ५० टक्के १० मि. ली. किंवा प्रवाही लॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ५ टक्के ६ मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून नवीन पालवी फुटण्याच्यावेळी फवारणी करावी. . |
| **नारळ/ सुपारी** | –– | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी कार्बारील पावडरचे (१० लिटर पाण्यात २० ग्रॅम) मिश्रण तयार करून फवारावे.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्यानी पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मिली ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस किंवा २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस. २० मिली पाणी नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| **भाजीपाला** | वाढीची अवस्था | • वांगी, मिरची, कोबी, नवलकोल इ. पिकांच्या रोपवाटीकेवर मावा, तुडतुडे, फुलकीडी यांचा प्रादुर्भाव दिसून येताच मॅलॅथिऑन (२० मिली प्रति १० लिटर पाण्यात) किंवा डायमिथोएट (१२ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात) मिसळून फवारावे.<br>• वांगी व मिरची यांची रोपे ५ ते ६ आठवडयाची झाली असल्यास त्यांची पूर्न:लागवड करावी. पूर्न:लागवड करतेवेळी रोपे डायमेथोएट १ मिली. प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवावीत व प्रत्येक ठिकाणी एकच रोप लावावेत. लागवड सरी वरब्यावर करावी (६०ग ६०सें. मी.). लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. |
| **कलिंगड लागवड** | – | • कलिंगड पिकामध्ये मर (वेली संपूर्ण सुकून जातात) या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच, कार्बेन्डॅझिम १ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात वेलीच्या बुंध्याशी ओतावे.<br>• कलिंगड वेलीच्या सभोवती सुक्या गवताचे किंवा प्लॅस्टिकचे आच्छादन करावे. |
| **दुभती जनावरे /शेळया** | – | • जनावराना पाणी पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठयामधे हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी.<br>• बहुवर्शीय स्वरुपाच्या वैरणीच्या पीकांची उदा. पॅरग्रास, यशवंत, नेपीयर इ. लागवड करावी.<br>• रात्रीच्यावेळी किमान तापमानात घट होत असल्याने जनावरांचे व पक्ष्यांचे थंडीपासून योग्य ते संरक्षण करावे. |
| **सुचना** | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |